श्री हरिहर प्रतिष्ठान संचलित

# गोंविदलाल कन्हैयालाल जोशी (रात्रीचे) वाणिज्य महाविद्यालय, लातूर

# साहित्यातील नवप्रवाह

मुख्य संपादक
डॉ. सुजाता चव्हाण
प्र. प्राचार्य

संपादक
प्रा. आरेफ शेख
प्रा. विद्यादेवी कांबळे



# मराठी साहित्यातील नवप्रवाह

- **डॉ. सुजाता चव्हाण,** मुख्य संपादक

**प्रा. आरेफ शेख,** संपादक

**प्रा. विद्यादेवी कांबळे,** संपादक

- **प्रकाशक:**
  **विझक्राफ्ट पब्लिकेशन्स् ॲन्ड डिस्ट्रीब्युशन प्रा. लिमिटेड,**
  **१२९/४९८, वसंत विहार, मुरारजी पेठ, जुना पुणे नाका, सोलापूर- ४१३००१**
  **भ्रमणध्वनी - ०९६३७३३५५५१, ०७०२०८२८५५२**
  **ई-मेल - wizcraftpublication@gmail.com**

- **मुद्रक:**
  **पालवी प्रिंटर्स,**
  **१२९/४९८, वसंत विहार, मुरारजी पेठ, जुना पुणे नाका, सोलापूर-४१३००१**

- **ISBN: ९७८-९३-८६०१३-८२-८**

- **रुपये: ३००/-**

**सर्व हक्क सुरक्षित** (या पुस्तिकेतील प्रकाशित माहिती पूर्व परवानगी शिवाय कुठल्याही माध्यमाव्द्‌ारे पुर्न प्रकाशित करता येणार नाही.)

या पुस्तकातील प्रकाशित माहिती, मते, विधान, विचार इत्यादी लेखकांचे वैयक्तिक असून लेखकांने व्यक्त केलेली मते, माहिती, विधाने, विचार, इत्यादी बाबत प्रकाशक, मुद्रक आदी सहमत असतीलच असे नाही.

## 23

# स्त्रीवादी साहित्यप्रवाह नाटकांच्या संदर्भात

**डॉ.संदीप अ.बनसोडे,** मराठी विभागप्रमुख, र.भ.अट्टल महाविद्यालय, गेवराई जि.बीड

---

'पिता रक्षति कौमार्ये भर्ता रक्षति यौवने, पुत्रो रक्षति वार्धक्ये, न स्त्री स्वतंत्रमर्हति' अशा प्रकारचे एक जुने वचन 'मनुस्मृती'मध्ये स्त्रीच्या संदर्भात केलेले आढळते. म्हणजे स्त्री ही सुरूवातीपासूनच परावलंबी आहे. पिता स्त्रीचे कौमार्य जपतो, तर पती स्त्रीचे यौवन जपतो आणि वार्धक्य आल्यास पुत्र स्त्रीचे पालन पोषण करतो असे यात मनुस्मृतीने नमूद करून स्त्री ही कायम कोणाच्या ना कोणाच्या आधारावर जगत आलेली आहे, ती स्वतंत्र नाही, तिने तसेच रहावे, अशी नोंद केली व हिंदू धर्माचा पवित्र धर्म ग्रंथ म्हणून सर्व पुरूषसत्ताक मंडळींनी या ग्रंथाचा त्यातील सांगितल्या गेलेल्या वचनांचा स्वीकार केला स्त्रीला कायम दास्यत्वात ठेवले. पाश्चात्य देशही याला अपवाद नाहीत.

अथेन्स शहरातील तत्त्वज्ञ सॉक्रेटिस (सुक्रतुस) याने आपली स्त्री 'झांटिप' हिला आपला स्नेही 'अल्कि बियाडिस' याला संभोगार्थ दिली, तसेच रोम शहरातील प्रसिद्ध मुत्सद्दी केटो याने आपली स्त्री 'मर्शिया' हिला आपला स्नेही 'होर्टेन्शियस' याला त्याच कार्याकरिता दिली. असे प्लूटार्क लिहितो.[1]

आदिम गणसमाजात टोळी प्रधानद्ध यज्ञाची चौकट बांधणे, विटा रचणे इ. कामे स्त्रियाच करीत. त्याचप्रमाणे गणभूमीच्या वाटपाचे अधिकार स्त्रियांकडेच असत. त्यातूनच स्त्रियांनी भूमितीचा शोध लावला, त्याकाळी कुठल्याही गटाचे काम कमी प्रतीचे मानलेले नव्हते. 'पुरूषी' व 'बायकी' असा भेदही कामांमध्ये नव्हता. स्त्री स्वतंत्र होती व शेतकरी गटात तिला जास्त स्वातंत्र्य होते. उत्पादन वाढवणारी नवनवीन साधने ती शोधून तयार करीत होती. त्या साधनांचे स्वामित्त्वही तिच्याकडे होते. तिच्या गटात हळूहळू मुलांना झेपणारे काम मिळू लागले. सुपीक प्रदेशात शेतीचे उत्पन्न जमातीच्या निर्वाहाला पुरेल इतके वाढल्यावर पारध व कंदमुळे गोळा करण्याचे काम दूय्यम ठरून सर्व जमात शेतीवर राबू लागली आणि शेतीवरच विसंबू लागली.

स्त्रीने विकास करून वाढवलेले काम पुरूषाने स्वीकारले याचा अर्थ, तोवर स्त्रीपुरूष असा वर्गभेद अस्तित्वात आलेला नव्हता. कोणतेही काम बायकी म्हणून हिणकस ठरलेले नव्हते.[2]

मेसोपोटेमियाच्या बॅबिलोनच्या राज्यात स्त्री आरंभी पूर्णपणे स्वतंत्र होती, तिला नवरा व भाऊ यांच्या बरोबरीने अधिकार असत. हामूरबीच्या वेळी तिचे स्थान थोडे उणावले, पण नवीन बॅबिलोनियन काळात स्त्रीला पुनश्च नवऱ्याच्या बरोबरीने स्थान मिळाले. इजिप्तच्या प्रदीर्घ इतिहासात स्त्रीला त्या समाजामध्ये नेहमीच उच्च स्थान होते. स्त्री ही पुरूषाच्या मालकीची वस्तू नसल्यामुळे विवाहपूर्व पावित्र्याचा आग्रह नव्हता. साडेतीन हजार वर्षापूर्वीच्या इजिप्तमध्ये कुठल्याही स्त्रीची, दासीची देखील संतती अवैध नसे. हॅवलॉक एलिस म्हणतो, "दीर्घायुषी, जीवनाने रसरसलेल्या व मानवी सभ्यतेवर सखोल ठसा उमटविणाऱ्या वरील दोन्ही संस्कृतीत स्त्रीला एवढे मानाचे स्थान असावे. हे सत्य लक्षात घेण्याजोगे आहे."[3]

स्त्रीसत्ताक समाजाचा पुढे अस्त झाला. गाळपेराची शेती मागे पडून शेतीमध्ये पशूच्या सहाय्याने अधिक उत्पादन काढण्याची रीत पुरूषांनी सुरू केली. यातूनच भारतामध्ये पुरूषसत्तेचा उदय झाला. यासोबतच वर्णव्यवस्थेचाही उदय झाला, आणि या वर्णव्यवस्थेने चतु:वर्णातील शुद्र नावाने ओळखल्या जाणाऱ्या वर्णाला अस्पृश्य म्हणून संबोधले व जनावरापेक्षाही हीन वागणूक दिली. ही हीन वागणूक फक्त अस्पृशांनाच दिली जात नव्हती तर अस्पृश्यांसोबत 'स्त्री' वर्गालाही ही वागणूक दिली जात होती, आणि हाच खरा हिंदू धर्म आहे अशी सूचना मनुस्मृती या धर्मग्रंथाने केली होती.

वर्णव्यवस्था व पुरूषसत्ता टिकविण्यासाठी उच्चवर्णीयांनी अनुकूल अशा धर्मग्रंथाची रचना केली. पुरूषप्रधान संस्कृती मानणारे आर्य भारतात आले. त्यांनी बालविवाह बहुपत्निकत्त्व, विधवांचा अमानुष छळ, सतीची चाल अशा अनेक भयानक व स्त्रीची विटंबना करणाऱ्या चालीरीती सुरू केल्या. हिंदू समाजातील स्त्रीचा अधिकार काढून टाकला आणि पुरूष प्रधान व स्त्री दुय्यम हे सूत्र समाजमनात पक्कं रूजवून टाकलं. तेंव्हापासून ते 19 व्या शतकात इंग्रजांचं राज्य येईपर्यंत स्त्रीची स्थिती काडीमात्र बदलली नाही. सर्व तऱ्हेचे दास्य स्त्रीनं मुकाट्यानं स्वीकारलेलं होतं. आपला कुणीतरी

असे. हा चेटकीणीचा आरोप कुणाही स्त्रीवर येण्याची शक्यता असल्यामुळे स्त्रियांचं जीवन तिथे सदैव भयकंपित, डळमळीत झालेलं होतं. अशा तऱ्हेची तीव्र भयग्रस्तता आपल्याकडील स्त्रियांना रोजच्या जगण्यात अनुभवायला येत नव्हती. रूढी परंपरांचे कास असायचे, पण या तऱ्हेचं भयग्रस्त जीवन आपल्या स्त्रीला जगावं लागलं नाही. वैधव्यानंतरचे अपार छळ सहन करण्यापेक्षा आणि जीवंत मरण भोगण्यापेक्षा विधवा स्त्रिया सती जात. पण स्त्रीला चेटकीण म्हणून पकडून तिचे हाल करून तिला जिवंत जाळण्यातलं क्रौर्य अधिक भयानक होतं[5]

अशी स्त्रीची ही अवस्था होती. ती केवळ पुरातन काळातच होती असे नाही तर आजही जरी स्त्रीजीवनाचा कायापालट झालेला असला, सतीची प्रथा इतिहासजमा झाली असली आणि पिवळ्या अष्टपुत्रीमधल्या चिमुरड्या वधूची जागा घोडनवरीने घेऊन ती शाळा-कॉलेजात जाऊ लागली असली, कथा कादंबऱ्या वाचता वाचता शिक्षणाचा फायदा घेऊन नोकरीत शिरली असली तरी जरा बारकाईने पाहिले तर दिसेल की स्त्रीजीवनात एवढे बदल होऊनही स्त्रीकडे पाहण्याचा समाजाचा दृष्टीकोन अजूनही बदललेला नाही. आजही स्त्रीला कोणी पालक असावा ती पुरूषाच्या अंकित असावी अशीच समाजाची भावना आहे. नवरा छळत असला तरी निष्ठेने त्याचा छळ सोसणाऱ्या स्त्रीबद्दल समाजाला आदर वाटतो, आणि नवऱ्याला सोडून जाणाऱ्या स्त्रीबद्दल समाज साशंक असतो. स्त्रियांनी कामाशिवाय घराबाहेर हिंडणे सायंकाळी उशिरा घराबाहेर पडणे या गोष्टींना समाजाचा विरोध आहे. स्त्रीची नजर भुईवर असावी, तिने घरामध्ये उलटून उत्तरे देऊ नयेत, बाहेर कोणाशीही वाद घालत बसू नये. जरूर तर पडते घेऊन नवऱ्याशी पटवून घ्यावे, तिने कोड्यांचा मांडा करावा अशी समाजाची आजही 21 व्या शतकात अपेक्षा आहे.

तिची ही स्थिती 19 व्या शतकात इंग्रजांच राज्य येईपर्यंत अशीच कायम राहिली. त्यात काडीमात्रही बदल झाला नाही सर्व तऱ्हेचे दास्य स्त्रीनं मुकाटयानं स्वीकारलेलं होतं. आपल्या कुणीतरी अंकित असावं ही पुरूषार्थाची कल्पना! स्त्री निसर्गतः दुबळी म्हणून त्याच्या अंकित झाली. नंतर तिच्यावर त्याग, सेवा, मातृत्त्व अशा देवत्त्वाच्या कल्पना लादल्या गेल्या, आणि तिलाही या शब्दांची गुंगी चढत गेली. अशी ही पतिव्रत्याच्या शिक्क्या करीता

प्रेम नसता केवळ कर्तव्य म्हणून समागम सोसणारी स्त्री ही कधीही श्रेष्ठ ठरली नाही.

इंग्रजांच्या आगमनाने परिस्थितीत बदल

इंग्रजांचं आक्रमण झालं नसतं तर ही परिस्थिती बदललीही नसती. परंपरागत मूल्यांना प्रमाण मानणारा आपला समाज कोणत्याच बदलासाठी उत्सुक नव्हता. पण इंग्रज आले आणि इथली मूल्य व्यवस्था बुद्धीच्या, तर्काच्या, आधुनिकतेच्या निकषांवर तपासण्याची आवश्यकता समाजाला जाणवू लागली. पारंपरिक मूल्यांनाही पर्याय असू शकतात हा विचार आपल्या लोकांच्या मनात सुरू झाला. मोक्ष, मुक्ती, परमेश्वरप्राप्ती इ. कल्पनांमुळे आपला समाज विचारशून्य व म्हणूनच कृतिशून्यही होता. इंग्रजांच्या राजवटीत मात्र आपली कृतिशून्यता या समाजाच्या लक्षात येऊ लागली. विविध गटांना व्यक्तींना आपले दास्यत्त्व आपल्यावरील अन्याय यांची जाणीव होऊ लागली. साहजिकच नव्यानं अस्तित्त्वात आलेल्या 'सामाजिक न्याय' या संकल्पनेचा त्यांना मोठा दिलासा वाटला. या सामाजिक न्यायाच्या आणि समतेच्या निकषावर जे जे अन्याय, हीन प्रतीचे, गैर, माणुसकीला काळीमा फासणारे होते, ते सारे बदलण्याचा प्रयत्न सुरू झाला. यातूनच मग सतीची चाल, बालविवाह, विधवा विवाहबंदी, केशवपन या रूढी परंपरांकडे नव्या नजरेनं पाहताना त्यातलं क्रौर्य जाणवू लागलं. राजा राममोहन रॉय, स्वामी दयानंद सरस्वती, म. ज्योतीबा फुले, आगरकर, कर्वे अशा अनेक समाजसुधारकांनी समाजोद्धाराचं काम हातात घेतलं. नवा दृष्टीकोन घेऊन सतीबंदी, विधवाविवाहाला मान्यता, स्त्री शिक्षणाची गरज, विधवांसाठी आश्रम अशा अनेक चळवळी सुरू झाल्या. शूद्रातिशूद्रांना शिक्षण मिळावे, ज्ञान मिळावे तसेच स्त्रियांना शिक्षण व ज्ञान मिळावे हे जोतीबांच्या सामाजिक कार्याचे एक उद्दिष्ट होते.

डॉ. आंबेडकरांचा शिक्षण–विषयक दृष्टीकोन म. फुलेंप्रमाणेच होता. फुलेंप्रमाणेच आंबेडकरांनीही आपल्या आयुष्यातील बराचसा कालावधी हा बहुजन जनतेच्या शिक्षणहक्कासाठीच्या संघर्षात घालवला होता. ब्रिटिश साम्राज्यवाद व ब्राह्मणशाही ह्या दोन शक्ती येथील बहुजन स्त्री पुरूषांच्या शिक्षणहक्काविरोधी आहेत हे त्यांनी जाणले. त्यांनी स्वतःच शैक्षणिक संस्था सुरू करण्याचा प्रयत्न केला. शिक्षण हक्काची लढाई ही त्यांनी आत्मसन्मानाची

लढाई मानली. 1920 सालीच भारतीय बहिष्कृत परिषदेत मुलींच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा ठराव पास करण्यात आला. 'शिका, संघटीत व्हा व संघर्ष करा' हा संदेश त्यांनी लढणाऱ्या स्त्री–पुरूषांना दिला.[20] "हिंदू स्त्रीला विद्या अध्यात्मज्ञान यापासून हिंदूधर्माने वंचित ठेवले होते. बुद्धांनी स्त्रीला पुरूषाच्या बरोबरीने ज्ञान प्राप्तीच्या व आध्यात्मिक उन्नतीचा अधिकार प्राप्त करून दिला. वस्तुतः स्त्रियांवर अन्याय करणाऱ्या वचनांचा आढळ 'मनुस्मृती' त होतो. बुद्धांनी मानवी स्वातंत्र्याचा पुरस्कार केला."[6] असे 'मनुस्मृती' बद्दल सांगणाऱ्या आंबेडकरांनी भर चौकात मनुस्मृतीचे दहन केले. स्त्रीला वडिलांच्या संपत्तीत वाटा मिळावा. तीला वैधव्य प्राप्त झाल्यानंतर पुनर्विवाह करता यावा, मर्जीनुरूप शिक्षण घेता यावं. यासाठी संसदेत हिंदू कोड बिल सादर केले, आणि हिंदू कोड बिल व ओ.बी.सी.ना आरक्षण हे मुद्दे भारताच्या पहिल्या पंतप्रधानानी साध्या चर्चेसाठीही न ठेवल्याने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केंद्रीय कायदेमंत्री पदाचा राजीनामा दिला.

स्त्रीच्या उद्धारासाठी कायद्याइतकंच आणखी एक महत्त्वाचं प्रभावी साधन म्हणजे स्त्रीला शिक्षण देण्याची सोय करणं. अर्थात स्त्रीला शिक्षण देण्याच्या कल्पनेमागचा मुख्य हेतू होता तो हा की, तिला वैधव्य आलं किंवा नवऱ्याने टाकलं, तर स्वतःच्या उदरनिर्वाहाची सोय करता यावी, त्यासाठी कुणा पुरूषाच्या दारी तिला तोंड उघडावं लागू नये.

समाजानं केलेल्या ह्या उपहाराला स्त्रीनं सतत तोंड दिलं. शिक्षणासाठी स्त्रीनं उंबरठा ओलांडला तेंव्हाही समाजानं तिचा पाणउतारा केला. आजही माणूस म्हणून जगण्याचं स्वातंत्र्य मागणारी स्त्री समाजाच्या कुचेष्टेचाच विषय झालेली दिसते.

आपल्या समाजात स्त्री पुरूषांचे नीतीचे मानदंड नेहमीच वेगवेगळे राहिले आहेत. दोघांची नीतीमत्ता वेगवेगळ्या निष्कर्षावर उभी राहिली. स्त्रीची अब्रू काचेचं भांडं मानली गेली. पुरूषाच्या संदर्भात मात्र या अर्थानं अब्रूचा प्रश्न नव्हता. स्त्रीच्या ठिकाणीही भावना, ध्येय, करूणा आहे, हे पुरूषाला मान्य नव्हतं. त्यामुळे ती फक्त त्याच्या सुखाचे एक साधन बनली हे केवळ जुन्या काळातच नव्हे तर आजही स्त्रिया पुरूषी मनोवृत्तीचा बळी होताना दिसतात. त्यांच्या जगण्यात फरक पडलेला नाही. रामायण महाभारतातील सीता, द्रोपदी पासून आजपर्यंत ही दुःख परंपरा चालूच आहे. पण तरीही आश्चर्याची

गोष्ट ही की, स्त्री ही स्वतःच्या प्रत्येक स्थितीत छळ करणाऱ्या पुरूषाविरूद्ध बंड करताना दिसत नाही. पाश्च्यात्य स्त्रीप्रमाणे भारतीय स्त्रीनं पुरूषप्रधान संस्कृती विरूद्ध पहिलं पाऊल उचललं नाही उलट तिची ही विकल अवस्था पाहून आगरकर, कर्वे उदारमतवादी पुरूषांनी स्वतः होऊनच स्त्रियांचे प्रश्न हाती घेतले.

समाजातील आणि कुटुंबातील आपल्या गौण स्थानाबद्दल आणि आपल्या गुलामगिरीबद्दल ती विचार करू लागली. तिची विचारशक्ती जागृत झाल्यामुळे आपले जीवन कसे असावे, आपला संसार कसा असावा आणि जीवनात आपण काय करावे याबद्दलही ती विचार करू लागली. ती स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी अर्थार्जन महत्त्वाचे म्हणून नोकरी करू लागली, त्यामुळे घराबाहेर स्वतःबद्दलचे स्वतंत्र निर्णय घेऊ लागली. नोकरीच्या ठिकाणी (कार्यालयात) किंवा इतर जागी तिचे पुरूषांशी संबंध येऊ लागले. त्यामुळे स्त्रीपुरूषांमध्ये स्नेहबंधने निर्माण होऊ लागली. ''शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे आणि ते पिल्यानंतर माणूस गुरगूरल्याशिवाय राहणार नाही'. या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या उक्तीप्रमाणे 'शिक्षण' हा घटक स्त्री जागृत करण्यास कारणीभूत ठरला त्याचबरोबर त्याकाळातील काही आंतराष्ट्रीय व राष्ट्रीय राजकीय घटनांचा परिणामही स्त्रीजागृतीस कारणीभूत ठरल्याचे दिसते.

1) रशियात राज्यक्रांती झाली आणि तेथे समाजसत्तावादी सरकार स्थापन झाले. हा समाजसत्तावादी विचारांचा प्रभाव इ. स. 1920 नंतर तरूण सुशिक्षित वर्गावर पडू लागला.

2) भारतीय राजकारणात याच सुमारास म.गांधीचा प्रवेश झाला. इ.स. 1930 नंतर म. गांधीकडे स्वातंत्र्य लढ्याची सूत्रे गेली. त्यांच्या स्त्रीविषयक भूमिकेमुळे अनेक स्त्रिया राजकारणात आणि समाजकारणात उतरू लागल्या आणि त्यामुळे घराबाहेरची अनेक क्षेत्रे स्त्रियांना खुली झाली.

3) या सुमारास पहिल्या महायुद्धास प्रारंभ झाला, आणि ते इ.स. 1919 साली संपुष्टात आले. पहिल्या महायुद्धाची झळ भारताच्या अर्थव्यवस्थेवर पोहचली. महागाई वाढली. दारिद्र्यही वाढले. त्यामुळे इ. स. 1920 नंतर कुटुंबाला आर्थिक मदत करण्यासाठी स्त्रिया नोकऱ्या करू लागल्या.

अशा या स्त्रीची होणारी कुचंबना मराठी साहित्यात हरि नारायण

आपटे यांच्यापासून प्रभावीपणे व्यक्त होऊ लागली. ही कुचंबना नाटक या प्रकारात काहीशी उशीरा म्हणजे रांगणेकरांपासून व्यक्त होऊ लागली. मात्र स्त्रीच्या दुःखाची विविध रुपे अतिशय प्रभावीपणे प्रकट झाली.

**मराठी नाटक :–**

मराठी नाटकांची सुरूवात ही पौराणिक नाटकांनी झाली. पुराणकथांचे आकर्षण व रंजनाची आवश्यकता या दोन गोष्टी त्यामागे होत्या. पुढे बदलत्या सामाजिक परिस्थितीत इहलोकनिष्ठ दृष्टिकोन जसजसा प्रबळ होऊन वाढीस लागला तसतसे साहित्याचे स्वरूप व प्रयोजन बदलले. रंजनाच्या दृष्टिकोनातून अवतरलेला पौराणिक नाटकांचा काळ ओसरून हळू हळू ऐतिहासिक व सामाजिक नाटकाची निर्मिती होऊ लागली. प्रथमारंभी असलेल्या रंजनाच्या प्रयोजनाला, तत्कालीन सामाजिक व राजकीय परिस्थितीला अनुरूप अशी उद्‌बोधनाची जोड मिळाली. नाटकाची समाजावर परिणाम करण्याची क्षमता इतर वाङ्मयप्रकारापेक्षा जास्त असल्यामुळे सुधारणेचे साधन म्हणून त्याकडे पाहिले गेले. समाजात आकांक्षा निर्माण करणे किंवा सामाजिक विचारजागृती निर्माण करणे या हेतूनेच प्रारंभ काळातील नाटके लिहिली गेली. ऐतिहासिक व पौराणिक नाटकातून रूपकाच्या आश्रयाने समाजाच्या राजकीय आकांक्षा व्यक्त होऊ लागल्या व सामाजिक नाटकातून समाजापुढे जे प्रश्न निर्माण होऊ लागले होते तत्संबंधीच्या विचार प्रवाहाचे दर्शन होऊ लागले.

इंग्रजी अंमलाच्या सुरवातीला पाश्चात्य संस्कृतीच्या प्रभावाने सामाजिक प्रबोधनाची जी लाट उसळली त्यामुळे त्याकाळच्या उपेक्षित व दुर्लक्षित स्त्री जीवनाकडे समाजसुधारकांचे लक्ष गेले व स्त्रीजीवन सुधारण्यासाठी अनेक सामाजिक चळवळींना सुरूवात झाली. स्त्रीजीवनाभोवती आवळलेले रूढींचे पाश हळूहळू मोकळे होऊ लागले. तेंव्हापासून तो आजपावेतो स्त्रीची मानवी स्वातंत्र्याकडे जी वाटचाल चालू आहे त्याच्या पाऊलखुणा वेळोवेळी लिहिल्या गेलेल्या स्त्रीजीवनविषयक सामाजिक समस्याप्रधान नाटकातून स्पष्टपणे उमटलेल्या आहेत. ही नाटके म्हणजे एकप्रकारे रंगभूमीवर झालेला स्त्रीमुक्तीचा आक्रोश आहे.

स्त्री जीवनाच्या सामाजिक समस्या हा जीवनाचा एक महत्त्वाचा भाग मराठी सामाजिक नाटकांच्या प्रारंभकालापासून आजतागयत मराठी

नाटकांतून सातत्याने प्रतिबिंबित झालेला आहे. स्त्रीजीवनाशी संबंधित असणाऱ्या काही सामाजिक समस्या आज कालौघात नष्ट झाल्या आहेत. काहींचे स्वरूप बदलले आहे, तर काही नव्याने उद्‌भवत आहेत. या समस्येत सापडलेल्या व्यक्तींच्या त्याबाबत कोणत्या क्रियाप्रतिक्रिया झाल्या आहेत, त्यांच्या भावनांचे क्षोभ कुठे उसळले आहेत वा ओसरले आहेत याचे चित्रण त्या त्या काळातील नाटकांतून झाले आहे.

नाटक हा समाजजीवनाचा आरसा असल्यामुळे समाजात वेळोवेळी स्त्रीजीवनाशी संबंधित असणाऱ्या ज्या सामाजिक समस्या निर्माण झाल्या, त्या बऱ्याच नाटकांचा विषय ठरल्या. या समस्येमुळे ज्या स्त्रीचे जीवन करपून अथवा कोमेजून जात आहे त्या स्त्रीचे जीवन भावनिक किंवा वैचारिक आकलन हे नाटकांतून मोठ्या प्रमाणात आलेले आहे, आणि आजपावेतो येतही आहे. स्त्रियांच्या बाबतीत लग्ने जुळविण्याचा व्यवहार, तो व्यवहार जुळविणारा मध्यस्थांचा वर्ग, त्यांचा स्वार्थ, 'मुकी बिचारी ना हाक ना बोंब' अशी स्त्री जात, वैधव्य आल्यास स्त्रीचा होणारा अपरिमित छळ अशी अत्यंत वास्तवपूर्ण समाजचित्रे अनेक नाटकांतून रंगविली जाऊ लागली. अशी वास्तवपूर्ण समाजचित्रे अनेक नाटकातून रंगविली गेली असली, तरी प्रत्येक वास्तववादी नाटक समस्याप्रधान असेलच असे नाही. समस्याप्रधान नाटकाच्या मागे विशिष्ट सामाजिक हेतू असतो. सामाजिक प्रबोधनाच्या अव्वल इंग्रजीच्या काळात तर विशिष्ट सामाजिक हेतूनेच सामाजिक नाटके लिहिली जाऊ लागली. जीवनातल्या समस्या ह्या कधी संपतच नसतात, काही सुटतात तर काही पुन्हा नव्याने निर्माण होतात. म्हणून समस्याप्रधान या नाट्यप्रकाराची निर्मिती अखंडितपणे सुरूच राहिली.[7] त्यातील काही नाटकांचा उल्लेख खालीलप्रमाणे आहे.

स्वैरसकेशा, रघुनाथ शंकर – 1870, मनोरमा, महादेव बाळकृष्ण चितळे 1871, रूढी, दिग्विजय रामकृष्ण भट्ट – 1855,

संगीत सौभाग्यरमा, अण्णा मार्तंड जोशी – 1890, इंदिरामाधव, रामचंद्र गोपाळ मिबाटवकर – 1895,

यानंतर 20 व्या शतकात पुनर्विवाहावर जी नाटके लिहिली गेली त्यांचे लेखक व प्रकाशनकाल पुढील प्रमाणे आहेत

संगीत इंदुमती, वि. ना. भावे –1902, मतिविकार, श्रीपाद कृ. कोल्हटकर –

1907, दंडधारी, दामोदर वि. नेवाळकर – 1907 प्रौढविधवाविवाह, ल. गो. देशमुख – 1910, प्रेमसंन्यास, राम गणेश गडकरी – 1912, प्रेमाभास, सदाशिव नारायण ठोसर –1916, भ्रमसंभ्रम, शि. मि. पारकर – 1918, परिवर्तन, श्रीपाद कृष्ण कोल्हटकर – 1922, सौभाग्यलक्ष्मी, स. अ. शुक्ल – 1925

अशा प्रकारे इंग्रजी अंमलाच्या सुरूवातीच्या काळात स्त्रीविषयक कायदे संमत करून घेण्यात पुरूषांचा पुढाकार होता. पुढे स्त्रिया जागृत होऊ लागल्यावर त्याच स्वतःवरील अन्याय दूर करण्यासाठी कायद्याची मागणी करू लागल्या आणि लिखाणही करू लागल्या पुरूष नाटककारांबरोबर स्त्री लेखिकांनीही पुढे 'अर्धांगी' मालती माधव तेंडुलकर 1933, 'नव्या वाटा' आनंदीबाई किर्लोस्कर 1943, 'समप्रण' आशा परचुरे 1961, अशी घटस्फोटाच्या समस्येवर नाटके लिहिली. पुढे परस्त्रीच्या आकर्षणाच्या समस्येची खालील नाटके रंगभूमीवर आली.

**संदर्भ टीपा**

1) "प्लूटाक्रकृत केटो" भारतीय विवाहसंस्थेचा इतिहास, इतिहासाचार्य वि. का.राजवाडे; लोकवाङ्मय गृह. सहावी आवृत्ती ऑगस्ट 2001.पृ.क्र. 50.
2) मॅन ॲण्ड वूमन, हॅवेलॉक एलीस पृ. क्र. 11 (आधार :– पृ. क्र. 005 भारतीय स्त्रीजीवन, गीतासाने. मौज प्रकाशन गृह आवृत्ती 1 ली ऑगस्ट 1986.)
3) सेक्स इन रिलेशन टू सोसायटी : लेखक हॅवेलॉक ऐलीस, पृ. क्र. 393, 394. (आधार : भारतीय स्त्रीजीवन, गीतासाने. मौज प्रकाशन गृह आवृत्ती 1 ली ऑगस्ट 1986.)
4) निर्णय सिंधू पृ. क्र. 626 आधार :"महर्षि ते गौरी", स्त्री स्वातंत्र्याची वाटचाल" मंगला आठलेकर राजहंस प्रकाशन पुणे.
5) "महर्षि ते गौरी, "स्त्री स्वातंत्र्याची वाटचाल" मंगला आठलेकर राजहंस प्रकाशन पुणे, पृ. क्र. 88, 87
6) डॉ. आंबेडकर यांचा तरूण विद्यार्थ्यांना उपदेश व मार्गदर्शन पृ. 21
7) सुधीर रसाळ : नाट्य व व्याजनाट्य. प्रतिष्ठान : वर्ष 20, अंक 3 रा, नोव्हेंबर 1971 पृ. क्र. 34

## महाविद्यालया बाबत

आर्थिकदृष्ट्या आणि सामाजिकदृष्ट्या मागासलेल्या भागात उच्च शिक्षणाची सुविधा प्रदान करण्याच्या हेतुने श्री. धनराजजी जोशी यांनी २०१२ मध्ये श्री. हरिहर प्रतिष्ठान संचलित गोविंदलाल कन्हैयालाल जोशी (रात्रीचे) वाणिज्य महाविद्यालयाची स्थापना केली. मराठवाड्यातील पहिले रात्रीचे महाविद्यालय दिवसभर काम करून रात्री अध्यापनाची सुविधा करून देण्याचा उद्देश ठेवून कार्यरत आहे. शैक्षणिक ओढ आणि साहित्याविषयीच्या जाणिवेपोटी या शिक्षणसंस्थेने दि. १८ फेब्रुवारी २०१९ रोजी एक दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन केले आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी धडपडत असलेले हे महाविद्यालय आहे.

## महाविद्यालयाची वैशिष्ट्ये

- शिक्षणापासून वंचित असलेल्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक संधी उपलब्ध करून देणारे मराठवाड्यातील पहिले रात्रीचे महाविद्यालय.
- मराठी तसेच इंग्रजी माध्यमांची निवड
- NPTL हा अभ्यासक्रम शिकवले जाणारे देशातील हे एकमेव महाविद्यालय आहे.
- ICWA, CA कोर्स ही सातत्यपूर्वक वाणिज्य शाखेसोबत चालविले जातात.
- अत्यावश्यक पायाभूत सुविधा, सुसज्य संगणक प्रयोगशाळा, अनुकूल शैक्षणिक वातावरण.
- सामाजिक, सांस्कृतिक, कला, क्रीडा, उपक्रमांमध्ये विद्यार्थ्यांचे लक्षणीय यश.

WIZCRAFT
Publications & Distribution Pvt. Ltd.
Registered Office:
129/498, Vasant Vihar, Near Old Pune Naka, Solapur- 413 001 (Maharashtra) India
09637335551, 07020828552 E-mail:wizcraftpublication@gmail.com

ISBN 978-93-86013-82-8
9 789386 013828

Rs. 300/-